महाराष्ट्र शासन
जिल्हा माहिती कार्यालय,गोंदिया

**यशकथा-१** **दि.२१.१०.२०१६**

# खोसेटोल्यात जलयुक्तच्या शेततळीमुळे निर्माण झाली संरक्षित सिंचन व्यवस्था

- **२३ शेततळयातून ८० हेक्टर संरक्षित सिंचन**
- **उत्पादनात वाढ होण्यास मदत**

**रा**ज्यात येत्या पाच वर्षात २५ हजार गावे टंचाईमुक्त करण्याचा संकल्प राज्य शासनाने जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून केला आहे. राज्यात या अभियानाला लोकचळवळीचे स्वरुप आले आहे. लोकसहभागातून कामे होत आहे. नैसर्गीक स्त्रोतांचे पुनरुज्जीवन करण्यात हे अभियान महत्वपूर्ण ठरले आहे. या अभियानातून तयार करण्यात आलेल्या शेततळयांमुळे शेतकऱ्यांना संरक्षित सिंचनाची व्यवस्था झाली असून उत्पादनात वाढ होण्यास मदत झाली आहे. जिल्ह्यातील गोरेगाव तालुक्यातील खोसेटोला येथे २३ शेततळी शेतकऱ्यांनी जलयुक्त शिवार अभियानातून तयार केल्यामुळे खोसेटोला हे शेततळयांचे गाव म्हणून ओळखले जात आहे.

गोरेगाव तालुक्यातील १६३ कुटुंबाचे ८०९ लोकवस्ती असलेले खोसेटोला हे गाव. इथल्या ग्रामस्थांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. बहुतांश धान उत्पादक शेतकरी असलेल्या या गावात शेतीपुरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसायाच्या कामात बहुतांश शेतकऱ्यांनी स्वत:ला झोकून दिले आहे. व्यसनासाठी गावात एकही पानटपरी नाही. ग्रामस्थांनी स्वत:ला शेती व दूध व्यवसायात व्यस्त करुन घेतले आहे. गावातील ६८ शेतकऱ्यांना चार वर्षापूर्वी कृषी विभागाने ५० टक्के अनुदानावर राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत कोरडवाहू शाश्वत शेती कार्यक्रमातून ८८ जर्सी व होस्टन जातीच्या दुधाळ गार्यीचे वाटप केले. या गार्यीपासून १३५० लिटर दुधाचे संकलन दररोज करण्यात येते. त्यामुळे खोसेटोल्यातील अर्थकारणात दुग्धव्यवसायाचा महत्वाचा वाटा आहे. राज्य शासनाच्या  जलयुक्त शिवार अभियान या महत्वाकांक्षी योजनेत इथल्या शेतकऱ्यांनी सहभागी होवून शेतीसाठी संरक्षित सिंचनाची व्यवस्था निर्माण केली आहे.

खोसेटोला गावचे २९४.६० हेक्टर क्षेत्र हे पिकाखाली असून भात हे इथले प्रमुख पीक आहे. पावसाच्या पाण्यावर खरीप हंगामात २६४ हेक्टरवर धान पीक घेण्यात येते. परंतू रब्बी पिकांसाठी सिंचनाची सोय नसल्यामुळे इथला शेतकरी मुख्यत: खरीप हंगामावर अवलंबून शेती करतो. सन २०१५-१६ या वर्षात राज्य शासनाने जलयुक्त शिवार अभियान हा महत्वाकांक्षी कार्यक्रम सुरु केला.

खोसेटोल्याच्या ग्रामस्थांना तालुका कृषी अधिकारी मंगेश वावधने यांनी जलयुक्त शिवार अभियानाचे महत्व पटवून दिले. केवळ पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहून शेतीतून अधिक उत्पन्न घेणे शक्य नसल्याची बाब ग्रामस्थांच्या लक्षात आली. पहिल्याच वर्षी २०१५-१६ मध्ये खोसेटोला गावाची निवड जलयुक्त शिवार अभियानासाठी करण्यात आल्यामुळे इथल्या शेतकऱ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. तालुका कृषि अधिकारी वावधने यांनी शेतकऱ्यांना संरक्षित सिंचनासाठी शेततळयाचे महत्व पटवून दिले. गावातील तब्बल २३ शेतकऱ्यांनी जलयुक्त शिवार अभियानातून आपल्या शेतात शेततळे तयार करण्याचा निश्चय केला. ३० बाय ३० आकाराची ३ मीटर खोलीची ८ शेततळी, ३० बाय २५ आकाराची ६ शेततळी, २५ बाय २५ आकाराची ३ आणि ४५ बाय २० आकाराची ३ शेततळी अशी एकूण २३ शेततळी खोसेटोल्यातील २३ शेतकऱ्यांच्या शेतात जलयुक्त शिवार अभियानातून तयार करण्यात आली. या २३ शेततळयातून ४०.२६ टीसीएम पाण्याची उपलब्धता झाली. त्यामुळे या शेतकऱ्यांची ८० हेक्टर शेतीला संरक्षित सिंचनाची व्यवस्था झाली.

जलयुक्त शिवार अभियानातून खोसेटोल्यातील २३ शेतकऱ्यांच्या शेतात शेततळी तयार करण्यात आल्यामुळे जिल्ह्यात सर्वाधिक शेततळी असलेले गाव म्हणून खोसेटोल्याची ओळख झाली. शेततळे असलेल्या शेतकऱ्यांनी शेजारधर्म म्हणून बाजूच्या शेतकऱ्यांना सुध्दा भाताचे पऱ्हे लागवडीकरीता शेततळयातून पाणी दिले.

..२

सप्टेंबर महिन्यात धानाची रोपे गर्भावस्थेत व ओंबीच्या अवस्थेत असतांना २५० मि.मी. पावसाची आवश्यकता असतांना प्रत्यक्षात २२२ मि.मी. तर ऑक्टोबर महिन्यात २०० मि.मी. पावसाची आवश्यकता असतांना प्रत्यक्षात ९६ मि.मी. पाऊस पडत असल्यामुळे शेतकऱ्यांना धानपिकाच्या उत्पन्नात घट व्हायची. परंतू निसर्गाने सप्टेंबर व ऑक्टोबरमध्ये दगा दिला तरी शेततळीतून संरक्षित सिंचनाच्या आधारावर शेतकऱ्यांनी चांगले धानाचे उत्पादन घेतले. शेततळी असलेल्या शेतकऱ्यांनी शेजारच्या शेतकऱ्यांना शेततळ्यातून पाणी दिल्यामुळे त्या शेतकऱ्यांच्या उत्पन्नात देखील वाढ झाली. खोसेटोल्याचे शेतकरी खेमचंद बिसेन म्हणाले, घरी असलेल्या साडेचार एकर शेतीतील धानाची रोवणी शेततळ्यातील पाण्यामुळे झाली. शेजारच्या रुपचंद पारधी या शेतकऱ्याला रोवणीसाठी पाणी दिले. पुढे या तळ्यातील पाण्यातून मत्स्यशेती सोबतच हरबरा, जवस पीक घेणार असल्याचे सांगितले. जलयुक्त शिवार अभियानातून संरक्षित सिंचनाची व्यवस्था झाल्यामुळे खोसेटोल्यातील शेतकरी सुखावला आहे.

**- विवेक खडसे**
**जिल्हा माहिती अधिकारी गोंदिया**
**मो. ९४२३४३४३०८**

**<u>यशकथा</u>-२**

# गंगाझरीतील जलयुक्तची कामे ठरली सिंचनाला आधार

**रा**ज्यातील दुष्काळ सदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासन सन २०१५-१६ या वर्षापासून जलयुक्त शिवार अभियान हा महत्वाकांक्षी कार्यक्रम राबवित आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यात जलसंधारणाची व शाश्वत सिंचनाची अनेक कामे करण्यात येत आहे. शेतकऱ्यांसाठी तर जलयुक्त शिवार अभियान हे वरदान ठरले आहे.

गोंदिया तालुक्यातील गोंदिया-तिरोडा मार्गावर असलेले गंगाझरी हे गाव. कृषि विभागाने गंगाझरीच्या परिसरात असलेल्या नाल्यावर जलयुक्त शिवार अभियानातून सिमेंट नाला बंधाऱ्याची दुरुस्ती केली. नाला खोलीकरणाचे काम देखील केले. या दुरुस्तीच्या कामामुळे पावसाचे पाणी बंधाऱ्यात साठवू लागले तर नाला खोलीकरणाच्या कामामुळे नाल्यातील सुपीक गाळ शेतकऱ्यांच्या शेतात टाकण्यात आला. नाल्यात पाण्याची साठवणूक मोठ्या प्रमाणात होवू लागली. बंधाऱ्यात पाणी अडवून शेतकऱ्यांना धान पिकाच्या सिंचनासाठी मदत होवू लागली. कधी एका पाण्याच्या कमतरतेमुळे उत्पादनात होणारी घट आता पाण्याच्या उपलब्धतेमुळे आणि नाल्यातील गाळ शेतीत टाकण्यात आल्यामुळे उत्पादनात वाढ होण्यास मदत झाली आहे.

जलयुक्त शिवार अभियानातून सिमेंट नाला दुरुस्ती आणि नाला खोलीकरणाची कामे करण्यात आली. नाला खोलीकरण करण्यात आल्यामुळे नाल्यात दूरपर्यंत पाण्याची साठवणूक आणि सिमेंट नाला दुरुस्तीमुळे पाण्याची अडवणूक करता येणे शक्य झाल्याचे गोंदिया पंचायत समितीचे सदस्य प्रकाश पटले यांनी सांगितले. या कामातून पाण्याची गरज पूर्ण होण्यास मदत झाली. नाला परिसरातील आणि सिमेंट नाला बंधारा परिसरात भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत झाल्याचेही श्री.पटले यांनी सांगितले.

जलयुक्त शिवार अभियानातून गंगाझरीजवळील नाला खोलीकरणाचे काम करण्यात आले. याच नाल्यावर असलेल्या सिमेंट नाला बंधाऱ्याची दुरुस्तीचे काम तसेच बोडी खोलीकरणाच्या कामामुळे पाण्याची साठवणूक, पाण्याची अडवणूक करण्यात आली त्यामुळे शेतकऱ्यांना खरीप, रब्बी व उन्हाळी हंगामात घेण्यात येणाऱ्या पिकांना सिंचनाची सोय उपलब्ध झाली. गंगाझरीतील वाहितीखाली असलेल्या २९३.९३ हेक्टर शेतीला मुबलक पाणी उपलब्ध झाले. या शेतीला ७६१.४१ टीसीएम पाण्याची आवश्यकता असतांना जुन्या कामामुळे ५३७.८३ टीसीएम पाणी साठविण्यात आले व जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात आलेल्या कामामुळे २२९.८५ टीसीएम पाणी साठविण्यात आले.

गंगाझरीच्या परिसरात जलयुक्त शिवार अभियानातून बोडी खोलीकरणाची कामे, सिमेंट नाला बंधाऱ्याची दुरुस्ती आणि नाला खोलीकरणाच्या कामामुळे २२९.८५ टीसीएम पाण्याची साठवणूक करण्यात आली. जुन्या कामामुळे व जलयुक्त शिवार अभियानांतर्गत करण्यात आलेल्या कामातून ७६७.४१ टीसीएम पाण्याची साठवणूक झाली आहे. या पाण्याच्या उपलब्धतेमुळे तर नाला व सिमेंट नाला बंधारा परिसरातील शेतकरी तर सुखावलाच सोबत वन्य व पाळीव प्राण्यांना देखील पाण्याची मुबलक उपलब्धता झाली आहे.

**- विवेक खडसे**
**जिल्हा माहिती अधिकारी गोंदिया**
**मो. ९४२३४३४३०८**

यशकथा-३

# नवनीतपुरात जलयुक्तमुळे कृषिला मिळाली संजीवनी

**ज**लयुक्त शिवार अभियान हा राज्य शासनाचा महत्वाकांक्षी कार्यक्रम. राज्यातील २५ हजार गावे पाच वर्षात टंचाईमुक्त करण्याचा संकल्प मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अभियानातून केला आहे. पाणीटंचाईला अनेक पर्यावरणीय आणि हवामानविषयक कारणे असली तरी पाण्याची उपलब्धता करण्यासाठी योग्य नियोजन व प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. गावागावात विकेंद्रीत पाणीसाठे निर्माण करण्यास जलयुक्त शिवार अभियान महत्वपूर्ण आहे.

जिल्ह्यात अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील नवनीतपूर हे पुनर्वसीत गाव. जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्याच वर्षी निकषानुसार नवनीतपूरची निवड करण्यात आली. नवनीतपूरच्या ग्रामस्थांना व तेथील शेतकऱ्यांना कृषी विभागाने जलयुक्त शिवार अभियानाचे महत्व पटवून दिले. नवनीतपुरात जलसमृध्दी तर यावीच सोबत इथला शेतकरी सुध्दा समृध्द व्हावा यासाठी कृषी विभागाने नवनीतपूरच्या गाव परिसरात पाण्याची अडवणूक, त्याची साठवण आणि त्यामधून सिंचनाची व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी गावाशेजारुन वाहणाऱ्या नाल्यावर चार सिमेंट बंधारे बांधले. चार नाला खोलीकरणाची कामे करण्यात आली. ६ कामे भात खाचरे दुरुस्तीची करण्यात आले. मजगीची सुध्दा ४ कामे करण्यात आली.

जलयुक्त शिवार अभियानातून गाव परिसरातील नाल्यावर चार सिमेंट नाला बंधारे बांधल्यामुळे नाल्यात दूरपर्यंत पाण्याची साठवणूक होवू लागली. नाले जलमय झाली. नाल्याच्या परिसरात असलेल्या शेतीतील विहिरींची पाण्याची पातळी तर वाढली सोबत कोरडवाहू शेतकऱ्यांना नाल्यातून सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता झाली. नाला खोलीकरणाच्या कामामुळे पाण्याची साठवणूक क्षमता तर वाढलीच खोलीकरणामुळे काढण्यात आलेला गाळ शेतात टाकण्यात आल्यामुळे शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत झाली. भात खाचरे दुरुस्तीच्या कामामुळे शेतीला सुरक्षितता आली. धानासाठी पुरेसे पाणी भात खाचरात साठवू लागले. भात खाचराच्या दुरुस्तीमुळे बांधाची उंची वाढली. त्यामुळे बांधावर शेतकऱ्यांना तीळ, तूरीच्या उत्पादन वाढीस मदत झाली. पूर्वी पडीक असलेली जमीन मजगीच्या कामामुळे लागवडीखाली आली. स्वत:च्या आर्थिक परिस्थितीमुळे शेतकरी मजगीची कामे करु शकत नव्हता. परंतू जलयुक्त शिवार अभियानातून मजगीच्या कामातून शेती लागवडीखाली आली.

नवनीतपूरचे वहितीखालील असलेले ५१८ हेक्टर क्षेत्रही पाणलोट क्षेत्र आहे. नवनीतपूरची पाण्याची आवश्यकता ८६१.९८ दशलक्ष घनमीटर असतांना जून्या जलसंधारणाच्या कामातून ८३७.१३ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध झाला. जलयुक्त शिवार अभियानाच्या कामामुळे २३४.१४ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध झाला. नवनीतपुरात या अभियानात लोकांच्या सहभागातून सिमेंट नाला बंधाऱ्यातील गाळ तसेच नाल्याच्या खोलीकरणातून गाळ काढण्यात आला. या अभियानातून करण्यात आलेल्या कामामुळे खरीप व रब्बी पिकास संरक्षीत सिंचनाची व्यवस्था निर्माण झाली.

नवनीतपूरचा युवा शेतकरी अशोक बिसनकर जलयुक्तच्या कामाबाबत समाधानी दिसला. त्याच्याकडे असलेल्या चार एकर शेतीतून तो पूर्वी पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहून खरीपमध्ये धान व तूर पीक तर रब्बीमध्ये जवस, हरबरा, लाखोरी घ्यायचा. आता मात्र पाण्याच्या उपलब्धतेमुळे धान, तूर, जवस, हरबरा व लाखोरीच्या उत्पादनात भरपूर वाढ होईल. तेलबियाचे क्षेत्र वाढविणार असून पाण्याच्या उपलब्धतेमुळे भाजीपाला पिके घेण्याचा विचार असल्याचे अशोकने सांगितले. माधोराव बिसनकर या शेतकऱ्याकडे असलेल्या दोन एकर शेतात आता खरीप व रब्बी हंगामात सुध्दा भाजीपाला, तेलबिया पिके घेवून सामाजिक स्थिती सुधारण्यास जलयुक्त शिवार अभियानाचा हातभार लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**- विवेक खडसे**
**जिल्हा माहिती अधिकारी गोंदिया**
**मो. ९४२३४३४३०८**

**यशकथा-४**

# कुंभीटोल्यात जलयुक्तमुळे गवसला कृषी समृध्दीचा मार्ग

शेती हा ग्रामीण जीवनाचा आधार. बहुतांश शेतकरी हे पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहून शेती करणारे. निसर्गाच्या लहरीपणावर अवलंबून शेती करणे म्हणजे बेभरोशाचे काम. मात्र राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी जलयुक्त शिवार अभियानाने ग्रामस्थांना व शेतकऱ्यांना जलसाक्षर करण्याचे महत्वपूर्ण काम केले.

जलयुक्त शिवार अभियानामुळे गावातील पाणी गावशिवार आणि शेतातील पाणी शेतशिवारात अडविण्यात आले. पाणी अडवून भूगर्भात जिरविण्यात आल्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत झाली. संरक्षित आणि विकेंद्रीत पाणीसाठे जलयुक्त शिवार अभियानातून तयार करण्यात आल्यामुळे शेतीची उत्पादकता देखील वाढली.

सन २०१४-१५ या वर्षात जलयुक्त शिवार अभियानाचे महत्व कृषि विभागाने शेतकऱ्यांना पटवून दिले. त्यामुळे शेतकरी जलसाक्षर झाले. अभियानाच्या माध्यमातून अडविण्यात आलेल्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा वापर शेतीच्या सिंचनासाठी कसा करता येईल यादृष्टीने संबंधित गावांनी नियोजन देखील केले.

अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील कुंभीटोला हे शेतकरी बहुल गांव. गावातील कुटुंबांचा मुख्य व्यवसाय शेती असून शेतमजूरी करणारे कुटुंबही गावात आहेत. कुंभीटोल्याचे भौगोलिक ३२८ हेक्टर क्षेत्रापैकी २२८ हेक्टर जमीन ही पिकाखाली आहे. मुख्य पीक धानाचे असल्यामुळे खरीप हंगामात पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहून तर रब्बी हंगामात उपलब्ध होणाऱ्या पाण्यामुळे काही शेतकरी धान पिकच घेतात.

जलयुक्त शिवार अभियानातून कृषि विभागाने तीन सिमेंट नाला बंधारे बांधले. या बंधाऱ्यामुळे वाहून जाणारे पाणी अडविण्यात आले. त्यामुळे हे नाले दुथडी भरुन वाहू लागले. नाल्याच्या परिसरातील शेतकऱ्यांना बंधाऱ्यामुळे अडलेल्या पाण्याचा वापर सिंचनासाठी मोठ्या प्रमाणात करता आला. २ एकर शेती असलेले शेतकरी श्री. गहाणे म्हणाले, या बंधाऱ्यामुळे शेतीसाठी संरक्षित सिंचनाची व्यवस्था झाली. धान पिकाला एका पाण्याच्या कमतरतेमुळे येणारी घट भरुन तर निघाली सोबत उत्पादनात वाढ होण्यास मदत झाली. बंधाऱ्यामुळे भूगर्भातील पाणीसाठा वाढला. नाल्याच्या परिसरात असलेल्या विंधन विहिरी आणि विहिरींतील पाण्याची पातळी वाढण्यास मदत झाली. आता रब्बी हंगामात जलयुक्त शिवार अभियानातून नाल्यावर बांधलेल्या सिमेंट नाला बंधाऱ्यामुळे उपलब्ध पाण्यातून लाखोरी, जवस आणि हरबरा पीक घेण्याचे नियोजन केल्याचे गहाणे यांनी सांगितले.

बोडी नुतनीकरणाचे काम जलयुक्त शिवार अभियानातून करण्यात आल्यामुळे शेतीची उत्पादन क्षमता तर वाढलीच सोबत शेतीतून जास्त उत्पादन घेण्याचा आत्मविश्वास बळावल्याचे पृथ्वीराज राऊत या शेतकऱ्याने सांगितले. पूर्वजांनी बांधलेल्या बोडीतील गाळ काढण्यात येवून ती खोल करण्यात आल्यामुळे पाण्याची साठवण क्षमता वाढली. बोडी नुतनीकरणामुळे संरक्षित पाणीसाठा निर्माण झाला. संरक्षित पाणीसाठ्याचा वापर पुढे रब्बी हंगामात भाजीपाला, जवस, हरबरा, लाखोरी, उडीद व मुगाचे पीक घेण्यासाठी करणार असल्याचे त्यांनी सांगितले. शेतीपुरक व्यवसाय म्हणून मत्स्योत्पादन बोडीतून करण्याचा विचार असल्याचे श्री.राऊत म्हणाले. पाण्याच्या उपलब्धतेमुळे आणि बोडीतील गाळ काढण्यात आल्यामुळे शेतीची उत्पादन क्षमता वाढल्याचे त्यांनी सांगितले. बोडी नुतनीकरणामुळे जवळपास ३ हेक्टर शेतीला फायदा झाल्याचे श्री.राऊत म्हणाले.

कुंभीटोल्याच्या वहितीखालील क्षेत्रातील परिसरात तीन सिमेंट नाला बांध, नाला खोलीकरणाची ५ कामे, १ शेततळे निर्मिती, बोडी खोलीकरणाचे एक काम, भात खाचरे दुरुस्तीची १३ कामे आणि बोडीतील गाळ काढण्याचे तीन कामे करण्यात आली. जलयुक्त शिवार अभियानातून ही कामे करण्यात आल्यामुळे १५०.५१ दशलक्ष घनमीटर पाणीसाठा निर्माण झाला.

जलयुक्त शिवार अभियानातून कुंभीटोल्याच्या वहितीखालील क्षेत्रात संरक्षित जलसाठा तर निर्माण झालाच सोबत भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत झाली. शेतीत गाळ टाकण्यात आल्यामुळे जमिनीची उत्पादन क्षमता देखील वाढली. कुंभीटोल्यात जलयुक्त शिवार अभियानामुळे कृषी समृध्दीचा मार्ग गवसल्याचे शेतकरी अभिमानाने सांगू लागले आहेत.

**- विवेक खडसे**
**जिल्हा माहिती अधिकारी गोंदिया**
**मो. ९४२३४३४३०८**

यशकथा-५

# जलयुक्त शिवार अभियानाचा म्हसवाणीच्या शेतकऱ्यांना आधार

जिल्ह्यात भाताचे उत्पादन जास्त प्रमाणात होत असल्याने भात उत्पादनात गोंदिया जिल्हा अग्रेसर आहे. धानावर प्रक्रिया करणारे लहान-मोठे उद्योग जिल्ह्यात कार्यरत आहेत. त्यामुळे गोंदिया जिल्ह्याला राईस सिटी ही नवी ओळख मिळाली आहे. परंतु पावसाचा लहरीपणा, अनियमितपणा, दुष्काळी परिस्थिती, नापिकी यामुळे शेतकरी संकटात सापडला. कधी कधी दुबार तिबार पेरणी करावी लागायची, त्यामुळे शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती हालाखीची व्हायची. लहान शेतकरी तसेच सर्वसामान्य शेतकरी कर्ज घेवून शेतीची कामे करायचा, परंतु पावसाच्या लहरीपणाचा परिणाम शेतीच्या उत्पादनावर होऊन शेतकरी कर्जाच्या संकटात सापडायचा.

शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी तसेच पावसाच्या पाण्याचा शेतीच्या कामासाठी पुरेपूर वापर करण्यासाठी म्हसवाणी या छोट्याशा गावाची निवड जलयुक्त शिवार अभियानाच्या २०१४-१५ या पहिल्याच वर्षी निवड करण्यात आली. या अभियानातून पाणी उपलब्ध झाल्यामुळे म्हसवाणीच्या शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे. सोबतच धानाचे उत्पादनही वाढले आहे. शेतीचे उत्पादन वाढल्यामुळे शेतकऱ्यांनी या अभियानाला चांगले सहकार्य केले.

सडक/अर्जुनी तालुक्यातील म्हसवाणी या छोट्याशा गावाची लोकसंख्या १४४५ इतकी आहे. गावाचे भौगोलिक क्षेत्र २७६.९० हेक्टर आहे. पिकाखाली एकूण क्षेत्र २२०.५० हेक्टर आहे. भात हे मुख्य पीक असून या पिकाखाली १८६ हेक्टर क्षेत्र आहे. म्हसवाणी या छोट्याशा गावात दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणारेही शेतकरी आहेत. सर्वसाधारण शेतकऱ्यांच्या शेतात १८ विहिरी व ८ बोरवेल्स आहेत. परंतू छोट्या शेतकऱ्यांना पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहून शेती करावी लागत होती. शेतशिवारातून लहानसा नाला वाहत गेला आहे. परंतू या नाल्याचे पाणी पावसाळ्याच्या दिवसात वाहून जात होते. जलयुक्त शिवार अभियानातून या नाल्यावर दोन बंधारे बांधल्यामुळे पावसाचे पडणारे पाणी अडविल्या जावू लागले. त्यामुळे नाल्यात पाणी साठवू लागल्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत झाली. विहीर व विंधन विहिरींची पातळी वाढली. नाल्याच्या दोन्ही काठावरील शेतीला पाण्यामुळे मदत झाली. पुर्वी या शेतकऱ्यांना नाल्याचा उपयोग होत नव्हता, जलयुक्तमुळे पाण्याची उपलब्धता झाली.

पुर्वी या शेतकऱ्यांना पाण्याची उपलब्धता होत नसल्यामुळे शेतीच्या उत्पादनात मोठी घट व्हायची. कधी कधी तर एका पाण्याच्या अभावी हातचे पीक जायचे. मागील दोन वर्षात शेतीच्या उत्पादनातील पैसेवारी कमी आल्याने म्हसवाणी टंचाईग्रस्त घोषित करण्यात आले. म्हसवाणी टंचाईग्रस्त असल्यामुळे या गावाची निवड जलयुक्त शिवार अभियानात करण्यात आली. शेतशिवारातून वाहत असलेल्या नाल्यावर जलयुक्त शिवार अभियानाअंतर्गत कृषि विभागाकडून २.७० मीटर उंच व ८.८६ मीटर लांबीच्या सिमेंट बंधाऱ्याचे बांधकाम करण्यात आले. या बंधाऱ्यातून पाणी साठवणूकीची क्षमता ८.९८ दशलक्ष घनमीटर एवढी निर्माण झाली. साठविलेल्या पाण्याचा उपयोग शेतीच्या कामासाठी करण्यात येत आहे. बंधाऱ्यातील साठविलेल्या पाण्याचा उपयोग करुन शेतकरी आपल्या शेतीची कामे वेळेत पूर्ण करीत आहेत. साठविलेल्या पाण्यातून विहिरी व इतर जलाशयातील पाण्याची पातळी वाढण्यास मदत झाली. जलयुक्त शिवार अभियानामुळे व शेतातील डोलदार धानाच्या पिकाकडे पाहून शेतीच्या उत्पादनात यावर्षी निश्चित वाढ होईल असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. सिमेंट बंधाऱ्यामुळे नाला तुडूंब भरलेला आहे. या साठविलेल्या पाण्याचा उपयोग उन्हाळी तसेच पावसाळी पिकासाठी होईल असे गावातील शेतकरी सांगत आहेत. जलयुक्त शिवार योजनेमुळे गावातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.

**- विवेक खडसे**
**जिल्हा माहिती अधिकारी गोंदिया**
**मो. ९४२३४३४३०८**